जननी सुरक्षा योजनेंतर्गत Direct Benefit Transfers या प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जसुयो २०१५/प्र. क्र. ५३४/ कु.क.

१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल आवार
लो.टि.मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २१ जानेवारी, २०१६

**वाचा -**

1) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांकः जसुयो-२००६/प्र. क्र. १७५/ कु.क.३, दिनांक २२ डिसेंबर, २००६**
2) **आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार पत्र क्रमांकः Z.१४०१८/३३/२०१२-JSY दिनांक २२ जानेवारी, २०१५**

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत आरसीएच बाबीमध्ये केंद्र शासनाकडून कृती आराखडयामध्ये जननी सुरक्षा योजना राबविण्यात येते. त्यानुसार संदर्भ क्र. १ अन्वये महाराष्ट्र शासनाने जननी सुरक्षा योजना राज्यात सुरु केली. या योजने अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील गर्भवती मातांना त्याचप्रमाणे अनुसुचित जाती व जमातीच्या कुटुंबातील गर्भवती मातांना आर्थिक लाभ देण्यात येतो. सदर आर्थिक लाभ हा लाभार्थ्यांच्या आधार कार्ड लिक असलेल्या थेट बँक खात्यात जमा करण्याकरीता PFMS- Public Financial Management System या संगणक प्रणाली चा वापर करण्याचे ठरविले आहे यात आशा कार्यकर्तीचे मानधन व इतर सर्व प्रकारची देयके यांचा समावेश आहे.या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा व मनपा (ग्रामीण, नागरी व शहरी भागात) मध्ये सदरील प्रणाली कार्यरत करणे आवश्यक वाटते. सदरील प्रणाली व्यवस्थितरित्या व सुरळीत चालू राहण्याच्या दृष्टीने सदर प्रणालीची राज्यस्तर व जिल्हा स्तरावर Direct Benefit Transfer (DBT) अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे समिती गठित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या जननी सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात थेट अनुदान प्राप्त करून देण्याकरीता राज्यस्तरीय कार्य प्रणाली समिती (State level Implementation Committee On Electronic transfer of Benefits for schemes implemented by Department of Health & Family Welfare) आणि जिल्हास्तरीय कार्यप्रणाली समिती (District level Implementation Committee On Electronic transfer of Benefits for schemes implemented by Department of Health & Family Welfare) खालील प्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

### राज्यस्तरीय कार्यप्रणाली समितीची रचना

| | |
|---|---|
| १) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण | - अध्यक्ष |
| २) सचिव ,DIT मंत्रालय, मुंबई | - सदस्य |
| ३) आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान , मुंबई | - सदस्य |
| ४) संचालक , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | - सदस्य |
| ५) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे | - सदस्य |
| ६) UIDAI/RGI Regional Officer. | - सदस्य |
| ७) व्यवस्थापक ,राज्यस्तरीय माहिती अधिकारी | - सदस्य |
| ८) व्यवस्थापक, राज्य स्तरीय नोडल बँक | - सदस्य |
| ९) सह संचालक (तांत्रिक) , राष्ट्रीय आरोग्य अभियान , मुंबई | - सदस्य |
| १०) उप संचालक , प्रजनन व बाल आरोग्य , राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे | - सदस्य सचिव |
| ११) उप संचालक , आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ (सर्व) | - सदस्य |

### राज्यस्तरीय कार्यप्रणाली समितीची कार्ये:-

१) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार Direct Benefit Transfer (DBT) या सुविधेच्या अंमलबजावणीसाठीच्या आराखडा व कार्यकाल (Time line) निश्चित करणे

२) Direct Benefit Transfer (DBT) प्रणाली योग्य व गतिशील ठरविण्यासाठी योग्य ते धोरण निश्चित करणे.

३) Direct Benefit Transfer (DBT) प्रणालीशी निगडित आवश्यक माहिती मिळविणेसाठी इतर संबंधीत विभाग व संस्थाशी समन्वय साधणे.

४) Direct Benefit Transfer (DBT) प्रणालीसंबंधीत आवश्यक माहिती एकत्रित करणेसंबंधी सर्व प्रकारचे व्यवस्थापन करणे.

५) Direct Benefit Transfer (DBT) प्रणालीची पडताळणी व साप्ताहिक पाठपुरावा करणे व त्याअनुषंगाने योग्य ते फेरबदल करणे.

**जिल्हास्तरीय कार्यप्रणाली समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद | - | उपाध्यक्ष |
| ३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| ४) उपसंचालक ,आरोग्य सेवा ,आरोग्य मडळ | - | सदस्य |
| ५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य सचिव |
| ६) जिल्हा शल्य चिकित्सक , जिल्हा रूग्णालय | - | सदस्य |
| ७) जिल्हास्तरीय माहिती अधिकारी )District Informatics Officer | - | सदस्य |
| ८) जिल्हा स्तरीय अधिकारी ,UIDAI/RGI Regional Officer | - | सदस्य |
| ९) व्यवस्थापक, जिल्हा स्तरीय नोडल बँक | - | सदस्य |
| १०) जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी | - | सदस्य |
| ११) तालुका आरोग्य अधिकारी सर्व | - | सहयोगी सदस्य |

**जिल्हास्तरीय समितीची कार्ये:-**

१) जिल्हा स्तरावर Direct Benefit Transfer ( DBT) या सुविधेची अंमलबजावणी करणे.तसेच सदर प्रणालींतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ हा इलेक्ट्रोनिक ट्रान्स्फ़र या बँकेच्या सुविधेमार्फ़त व्यवस्थितरीत्या होईल याची दक्षाता घेण्यात यावी.

२) Direct Benefit Transfer (DBT) प्रणालीशी निगडित आवश्यक माहिती मिळविणेसाठी इतर संबंधीत विभाग व संस्थाशी समन्वय साधणे.

३) ज्या योजनांतर्गत Direct Benefit Transfer (DBT) चा लाभ दिला जाणार आहे त्या सर्व योजनांशी संबंधित माहितीचे डिजीटायझेशन करणे

४) साप्ताहिक आढावा बैठकीचे आयोजन करून त्यात सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ते फ़ेरबदल करणे.

५) प्रत्येक प्रसुती केंद्रावरील संगणक, इंटरनेट व्यवस्था सुरळीत असल्यासंबंधीचा अहवाल घेणे.

६) जिल्हा स्तरीय समिती आपला मासिक अहवाल अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालयास सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२११४५३५१६७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yamuna D Jadhav

Digitally signed by Yamuna D Jadhav
DN: CN = Yamuna D Jadhav, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2016.01.21 15:33:40 +05'30'

**(यमुना जाधव )**
**महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव**

प्रत,

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
२. सचिव ,DIT मंत्रालय, मुंबई.
३. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी (सर्व जिल्हे)

४. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा उपाध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी (सर्व जिल्हे)
५. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य मिशन, मुंबई
६. संचालक , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
८. उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
९. विभागीय संचालक, (कुटुंब कल्याण) केंद्रशासन, ८४-२ पर्वती पहिला मजला दर्पण बिल्डींग सहकारनगर, पुणे
१०.प्रशासक/महानगरपालिका आयुक्त (सर्व महानगरपालिका)
११.आरोग्य/ वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका (सर्व)
१२.मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
१३.जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रुग्णालय, (सर्व)
१४.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१५.विशेष अधिकारी कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका, वार्ड ४, दक्षिण परेल, मुंबई १२
१६.निवड नस्ती (कु.क.)